RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




शनिवार, २२ मार्च २०२५ | वर्ष : ५ | अंक : ८६ | दैनिक | किंमत : ₹५/-
Saturday, 22 March 2025 | Year : 5 | Issue : 86 | Daily | Rate: Rs. 5/-

# एलोन मस्कची कंपनी एक्सने केला भारत सरकारवर खटला दाखल

**नवी दिल्ली :** अब्जाधीश एलॉन मस्क यांच्या मालकीची असलेल्या एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मने कर्नाटक उच्च न्यायालयात भारत सरकारविरोधात खटला दाखल केला आहे. 'केंद्र सरकार माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या (आयटी) कलम 79 (3) (ब) चा दुरूपयोग करून एक्सवरील मजकूर ब्लॉक करत आहे. ही अभिव्यक्ती स्वातंर्त्याची गळचेपी आहे', अशी भूमिका एक्सने मांडली आहे. कायद्यातील तरतुदींचा चुकीचा अर्थ लावून सरकार अवैधरित्या नियंत्रण आणू पाहत आहे, असाही आरोप एक्सने खटल्यात केला.

एक्सने केंद्र सरकारवर आरोप करताना पुढे म्हटले की, 'सहयोग' नामक पोर्टलच्या माध्यमातून सोशल मीडियावरील सामग्री ब्लॉक करण्यासाठी समांतर आणि अवैध प्रणाली सरकारने तयार केली आहे. हे पोर्टल भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र (आय4सी) द्वारे संचालित केले जाते. याचा वापर करून विविध राज्य सरकार आणि पोलीस विभाग सोशल मीडियावरील सामग्री हटविण्यासाठी आदेश देऊ शकतात. सहयोगमध्ये सहभागी होणे बंधनकारक नाही एक्सने न्यायालयात दावा केला की, कोणताही कायदा आम्हाला सहयोग पोर्टलमध्ये सहभागी होण्यास बंधनकारक नाही. माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार आवश्यक असलेल्या अधिकाऱ्यांची आम्ही आधीच नियुक्ती केली आहे. त्यामुळे सहयोग पोर्टलची वेगळी आवश्यकता नाही.





### सरकारवर काय आरोप केले?

एक्सने म्हटले की, माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम 79 (3) (ब) नुसार सरकारला मजकूर ब्लॉक करण्याचा अधिकार मिळत नाही. पण केंद्र सरकार कलम '69अ' च्या जागेवर या कलमाचा वापर करत आहे. सर्वोच्च न्यायालयाने 2015 साली श्रेय सिंह्ल खटल्यात स्पष्ट निर्देश दिले आहेत की, सोशल मीडिया संकेतस्थळावरील सामग्री केवळ कलम 69अ किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरच हटविता येईल.

### सहयोग पोर्टल म्हणजे काय?

सह्योग पोर्टल हा एक सुरक्षित सायबरस्पेस तयार करण्यासाठी सरकारी संस्था आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्ममधील सहकार्य वाढवण्याचा एक उपक्रम आहे. याचा उद्देश बेकायदेशीर सामग्री ऑनलाइन रिपोर्ट करण्याची आणि काढून टाकण्याची प्रक्रिया सुलभ करणे, तसेच कायदा अंमलबजावणी संस्थांकडून डेटा विनंत्या व्यवस्थापित करणे आहे. हे पोर्टल केंद्र आणि राज्य सरकारच्या अधिकृत एजन्सींना सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या सहकार्याने सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यास मदत करते.

# कर्नाटकच्या विधानसभेत हनी ट्रॅपचा मुद्दा तापला

**बेंगलूर :** कर्नाटकमध्ये सध्या हनी ट्रॅपच्या मुद्यांवरून चांगलंच राजकारण तापले आहे. सहकार मंत्री के.एन. राजन्ना यांनी विधानसभेत बोलताना एक मोठा दावा केला होता. 'एका केंद्रीय नेत्यासह जवळपास 48 नेते हनी ट्रॅपमध्ये अडकले आहेत', असे के.एन. राजन्ना यांनी म्हटले होते. त्यांच्या या दाव्यानंतर कर्नाटकच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. त्यानंतर कर्नाटकच्या विधानसभेत आज मोठा गदारोळ पाहायला मिळाला. मुस्लिम आरक्षण विधेयक आणि हनी ट्रॅपच्या मुद्यांवरून सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आल्याचे पाहायला मिळाले. यातच आज कर्नाटक सरकारने सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना 4 टक्के आरक्षण देणारे विधेयक मंजूर केले. मात्र, भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी या विधेयकाला जोरदार विरोध केला. तसेच कर्नाटक सरकारच्या या निर्णयाला भाजपाने कायदेशीररित्या आव्हान देण्याचा निर्णय घेतला.



सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना 4 टक्के आरक्षण देणाऱ्या विधेयकाला भाजपाने जोरदार विरोध करत विधानसभेत जोरदार घोषणाबाजी केली. तसेच भाजपाच्या काही आमदारांनी या विधेयकाची प्रत आणि काही कागदपत्रे थेट विधानसभेच्या अध्यक्षांवर भिरकावल्याचा आरोप सत्ताधारी करत आहेत. तसेच सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आल्याचंही पाहायला मिळाले. यामुळे सभागृहात मोठा गोंधळ पाहायला मिळाला. भाजपा आमदारांच्या प्रचंड गदारोळानंतर विधानसभेचे कामकाज काहीवेळासाठी तहकूब करण्यात आले. दरम्यान, कर्नाटक विधानसभेत हनी ट्रॅपच्या मुद्यांवरून भाजपा नेत्यांनी सभागृहाच्या वेलमध्ये घुसून मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली. तसेच विरोधी आमदारांनी सभापतींच्या आसनापाशी जाऊन कर्नाटक सरकारच्या निर्णयाचा निषेध केला. भाजप आमदार भरत शेट्टी यांनी म्हटले की, 'हनी ट्रॅपच्या मुद्यांवर चर्चा करण्याऐवजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या हे 4 टक्के मुस्लिम विधेयक मांडण्यात व्यस्त आहे. मात्र,आम्ही याचा निषेध केला आहे. आम्ही कोणालाही इजा केलेली नाही, असे भरत शेट्टी यांनी म्हटले आहे.

# कारागृहांवरील भार कमी करण्यासाठी कैद्यांचे 'इलेक्ट्रॉनिक मॉनिटरिंग'




**नागपूर :** आदेशभरातील कारागृहांवरील अतिरिक्त भार कमी करण्यासाठी तसेच फौजदारी न्याय व्यवस्थेत तुरुंगाला पर्याय म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कैद्यांची 'इलेक्ट्रॉनिक मॉनिटरिंग' करण्याची शिफारस सर्वोच्च न्यायालयाच्या 'प्रिझन इन इंडिया' अहवालात करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या 'संशोधन आणि नियोजन' विभागाद्वारे अलीकडेच प्रकाशित या अहवालात परदेशात वापरण्यात येत असलेल्या तंत्रज्ञानाचा उल्लेख करीत कैद्याच्या हातावर घड्याळासारखे यंत्र लावून त्यांच्यावर पाळत ठेवावी, असे सुचवण्यात आले आहे. एकविसाव्या शतकात प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. न्यायव्यवस्थेत तंत्रज्ञानाचा वापर केल्यावर आता देशातील कारागृहांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे, असे मत व्यक्त करत 'इलेक्ट्रॉनिक मॉनिटरिंग'चा पुरस्कार या अहवालात करण्यात आला आहे. 2023 साली केंद्रीय गृह विभागाने ब्रिटिशकालीन तुरुंग कायदा, 1894 च्या जागी नवा आदर्श तुरुंग आणि सुधारात्मक सेवा कायदा, 2023 आणला. या कायद्याच्या कलम 29 मध्ये देशात प्रथमच इलेक्ट्रॉनिक ट्रॅकिंग यंत्राचा वापर करावा, असे नमूद करण्यात आले. या तरतुदीनुसार, एखाद्या कैद्याला तुरुंगातून रजा मंजूर केल्यावर त्याच्यावर देखरेखीसाठी वरील यंत्राचा वापर करता येतो, असे स्पष्ट करण्यात आले. यापूर्वी 268 व्या अहवालात 'लॉ कमिशन'ने या तंत्रज्ञानाच्या वापराबाबतचा सल्ला दिला होता. कारागृहांवर होणारा शासकीय खर्च आणि फरार कैद्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी 'इलेक्ट्रॉनिक मॉनिटरिंग' तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असे अहवालात नमूद आहे.

# घरात रोकड सापडलेल्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अडचणीत वाढ

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या शासकिय निवासस्थानाला आग लागल्याच्या घटनेनंतर त्यामध्ये मोठ्या प्रमाणात रोकड सापडल्याच प्रकार उघडकीस आला आहे. यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने न्यायमूर्तीच्या होत असलेल्या आरोपांच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांकडे या प्रकरणी अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.



न्यायाधीश यशवंत वर्मा यांची सर्वोच्च न्यायलयाच्या कॉलेजियमकडून शिफारस करण्यात आल्यानंतर काही दिवसांपूर्वीच अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती. बंगल्याला आग लागल्यानंतर त्यामध्ये मोठ्या प्रमाणात रोकड आढळून आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला होता. कायदेतज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, जेव्हा कधी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांवर गैरवर्तवणूकीचे आरोप केले जातात तेव्हा त्या संबंधीत उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना याबद्दलचा अहवाल सादर करावा लागतो. जेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांवर आरोप केले जातात तेव्हा भारताच्या सरन्यायाधीशांच्या पुढाकाराने इन-हाऊस समिती स्थापन केली जाते. यापूर्वी घडलेल्या अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्या. शेखर यादव आणि कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्या. सीएस करनान यांच्या प्रकरणात देखील हीच प्रक्रिया केली होती.

प्रकरणाबद्दल माहितीचा आढावा घेतल्यानंतर सीजेआ संजीव खन्ना यांनी कॉलेजियमची बैठक बोलवली, ज्यामध्ये एकमताने न्यायमूर्ती वर्मा यांना अलाहाबाद उच्च न्यायालयात परत पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला.

# तब्बल 35 कोटींपेक्षा अधिकचा मालमत्ता कर थकीत

**चंद्रपूर :** मालमत्ता कराची 35 कोटींपेक्षा अधिकची रक्कम थकीत असल्याने महापालिकेने जप्ती मोहिम तीव्र केली आहे. आतापर्यंत 1 हजार पेक्षा अधिक थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. येत्या काळात ही मोहिम अधिक तीव्र केली जाणार आहे. महापालिकेतर्फे 31 मार्चपुर्वी अधिकाधिक मालमता कर वसुलीचे ध्येय समोर ठेऊन नियोजन केले. मनपाची पथके थकबाकीदारांच्या घरी जाऊन वसुली करीत आहेत. 31 मार्चपर्यंत शास्तीवर 25 टक्के सूट देण्यात आली असुन तरीही कर भरणा न करणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता सील व जप्त केल्या जात आहेत. नुकतेच एमईएल प्रभागातील तुकडोजी महाराज सेवा समिती इथे 13 गाळे सील केले आहे . प्रत्येक झोनमध्ये 5 याप्रमाणे 15 व मार्केट वसुलीसाठी 2 याप्रमाणे 17 पथकांवर वसुलीची जबाबदारी असुन आतापर्यंत 56.33 टक्के वसुली करण्यात आली आहे.



थकबाकीदारांवर मनपाची धडक कारवाई

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनेशनल पार्ककरिता राखीव जागेचे भूसंपादन करावे

## डॉ. नितीन राऊत यांच्या नेतृत्वात कृती समितीची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**नागपूर :** उत्तर नागपुरातील मौजा नारा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पार्कच्या आरक्षित जागेचे भुसंपादन करुन या पार्कचा विकास करण्याची मागणी आज राज्याचे माजी मंत्री आणि उत्तर नागपूरचे आमदार डॉ. नितीन राऊत यांच्या नेतृत्वात डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनेशनल पार्क बचाव कृती समितीने आज विधानभवनात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मागणी केली, यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. मौजा नारा येथील खसरा क्र. 161, 162 (पार्ट), 163 (पार्ट), 164 ते 176, 202, 203, 211, 212, 213 मधील 52.63 हेक्टर जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनेशनल पार्क करिता राखीव आहे. दि. 26 सप्टेंबर 2006 रोजी पाच कोटी तीन लाख रुपये व दि. 20 सप्टेंबर 2011 रोजी अकरा लाख पन्नास हजार रुपये शासनाने उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) नागपूर यांच्याकडे जमा केले होते. परंतू आजपर्यंत पार्कचा विकास झाला नसल्याने या विषयाकडे आज डॉ. राऊत यांनी मुख्यमंत्री यांचे लक्ष वेधले. मुख्यमंत्र्यांनी दिला शब्द; म्हणाले...माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या नेतृत्वात आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनेशनल पार्क बचाव कृती समितीने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन 02 ऑक्टोबर 2024 पासून सुरु असलेल्या साखळी उपोषणाबाबत माहिती दिली. 170 दिवसापासून सुरू असलेल्या या आंदोलनाची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी नारा पार्कच्या प्रश्नावर शक्य तितक्या लवकर निर्णय घेण्याचा शब्द यावेळी दिला. प्रसंगी कृती समितीचे पदाधिकारी अॅड. हंसराज भांगे, मुरलीधर मेश्राम, नरेश महाजन, हरीश नारनवरे उपस्थित होते.



# नागपूरच्या अंबाझरी प्रकल्पावरून मुख्यमंत्री पेचात?

**नागपूर :** नागपूरच्या अंबाझरी उद्यानाचा विकास आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक उभारणी प्रकल्प उभारणीमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पेचात सापडले आहेत. प्रकल्पाच्या उभारणीची जबाबदारी असलेल्या कंपनीमागे पक्षातीलच विश्वासू आमदाराचे पाठबळ आहे तर प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांमध्ये विरोधी पक्षातील पण मित्रत्वाचे संबंध असलेल्या दुसऱ्या आमदाराचा समावेश आहे. त्यामुळे मैत्री सांभाळताना मुख्यमंत्र्यांची तारेवरची कसरत होत आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात यावर चर्चा झाल्याने हा मुद्दा पुन्हा ऐकदा ऐरणीवर आला आहे. पूर्वी या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व खुद्द फडणवीस करीत होते. (ते दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघात गेले.) सध्या पश्चिम नागपूरचे प्रतिनिधीत्व काँग्रेस आमदार विकास ठाकरे करतात. ते काँग्रेसचे आमदार असले तरी त्यांचे आणि फडणवीस यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत.. ठाकरे हे अंबाझरी उद्यान विकास प्रकल्प व परिसरातील आंबेडकर स्मारक उभारणी प्रकल्प उभारणी करणाऱ्या कंत्राटदार कंपनीच्या विरोधात आंदोलन करीत आहेत. त्यांनी सध्या सुरू असलेल्या विधिंमंडळाच्या अधिवेशनात सध्या बंद असलेले उद्यान नागरिकांसाठी खुले करण्याची मागणी केली, ही झाली एक बाजू. दुसरी बाजू अशीच रंजक आहे.



# लंडनमध्ये सबस्टेशनला भीषण आग! हिथ्रो विमानतळ केले बंद

**नवी दिल्ली :** लंडनच्या पश्चिम भागातील एका सबस्टेशनला लागलेल्या आगीमुळे लंडनचे हिथ्रो विमानतळ मध्या रात्रीपर्यंत बंद करण्यात आले आहे. यामुळे येणाऱ्या आणि जाणाऱ्या किमान 1,351 विमानांना याचा फटका बसला आहे. या आगीच्या घटनेमुळे शहरातील अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणात वीज खंडीत झाली असून 16 हजारहून अधिक घरांमधील वीज गेली आहे. ब्रिटिश माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, 150 हून अधिक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. लंडन अग्निशमन दलाने सांगितले की, त्यांनी सुमारे 10 फायर इंजिन्स आणि जवळपास 70 अग्निशामक दलाचे जवान तैनात केले आहेत. याबरोबरच 200 मीटरचा सुरक्षा घेरा तयार करण्यात आला आहे. दरम्यान आग लागलेले सबस्टेशन हे लंडनच्या Hillingdon borough मधील Hayes येथे असून येथील स्थानिक रहिवाशांना धुरामुळे घरात राहण्यास आणि खिडक्या आणि दरवाजे बंद ठेवण्यास सांगण्यात आले आहे.




# नागपुरात पुन्हा संचारबंदी

**नागपूर :** नागपुरातील महाल परिसरात 17 मार्च 2025 रोजी रात्री दोन धार्मिक गटात झालेल्या दंगलीनंतर प्रशासनाकडून एकूण 9 पोलीस ठाणे हद्दीतील संचारबंदी लावण्यात आली होती. त्यापैकी पाच पोलीस ठाणे आंतर्गत संचारबंदीत दोन तास शिथिलता देण्याचा निर्णय पोलीस आयुक्तांनी गुरूवारी (20 मार्च 2025) घेतला. आता शुक्रवारी पुहा हा निर्णय रद्द करत पोलीस आयुक्तांनी नवीन आदेश काढला आहे.

पोलीस आयुक्तांच्या नवीन आदेशानुसार शहरातील संचारबंदी लावलेल्या निर्णयामध्ये पुन्हा बदल करण्यात आला आहे. त्यानुसार नागपूर शहरातील सहा पोलीस ठाण्यांतर्गत संचारबंदीमध्ये देण्यात आलेली 2 तासांची शिथिलता रद्द केली गेली आहे. त्याबाबतचे आदेशही नागपूर शहर पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल यांनी जारी केले आहे. दरम्यान गुरूवारी (20 मार्च 2025 रोजी) पोलीस आयुक्तांनी लकडगंज, सक्करदरा, पाचपावली, शांतीनगर, इमामवाडा, यशोधरानगर या सहा पोलीस स्टेशन अंतर्गत दुपारी दोन ते संध्याकाळी चार या दोन तासासाठी शिथिलता प्रदान केली होती. मात्र आता जूना आदेश रद्द करत त्या सहा पोलीस ठाणे हद्दीत पोलिसांनी पुन्हा पूर्ण वेळ संचारबंदीचा आदेश काढला आहे. नागपुरात दोन धार्मिक गटात दंगल घडल्यावर एकूण 11 पोलीस स्टेशन हद्दीत संचारबंदीचे आदेश लागू करण्यात आले होते. त्यापैकी दोन पोलीस स्टेशन हद्दीतील संचारबंदी गुरूवारीच उठवण्यात आली होती. तर मूळ दंगल घडलेल्या शहरातील तीन पोलीस ठाणे हद्दीत संचारबंदी कायम ठेवण्यात आला आहे.

# मुस्लीम समाजाच्या आरक्षणावरुन वादंग

## आमदारांना मार्शलने उचलून, उचलून सभागृहाबाहेर नेले, 18 जणांचे निलंबन

**बेंगलूर :** कर्नाटकच्या विधानसभेत शुक्रवारी मोठा राडा झाला. कर्नाटकात सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना 4 टक्के आरक्षण देण्याच्या घेतलेल्या निर्णयावरून कर्नाटक विधानसभेत गदारोळ झाला. यानंतर कर्नाटक विधानसभेतून आज जे चित्र समोर आले ते धक्कादायक होते. भाजप आमदारांनी या चार टक्के कोट्याला विरोध केल्यानंतर मार्शल बोलवून त्यांना उचलून उचलून सभागृहाबाहेर काढले. त्यानंतर सभागृहात आरक्षणाचे विधेयक संमत झाले. तसेच सभागृह अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आले. भाजपच्या 18 आमदारांचे सहा महिन्यांसाठी निलंबन करण्यात आले आहे.

कर्नाटक मंत्रिमंडळाने शुक्रवारी कर्नाटक ट्रान्सपेरेंसी इन पब्लिक प्रोक्योरमेंट्स अधिनियमात संशोधन करण्यास मंजुरी दिली. त्यानुसार दोन कोटीपर्यंतचे कंत्राट देण्यासाठी मुस्लीम समाजाला चार टक्के आरक्षण दिले. या निर्णयास भारतीय जनता पक्षाने विरोध केला. पक्षाचे खासदार यांनी पत्रकार परिषद घेऊन कर्नाटक सरकारचे हे असंवेधानिक पाऊल असल्याचे म्हटले. मुख्यमंत्री सिद्धारमैया सरकारने हा निर्णय त्वरीत मागे घेण्याची मागणी त्यांनी केली.

आमदारांचा पगार 100 टक्के वाढला

भाजप आमदारांचा गदारोळ सुरु असताना मुख्यमंत्री, मंत्री अन् आमदारांचा पगार शंभर टक्के वाढ करण्याचे विधेयक संमत करण्यात आले. हे विधेयक कर्नाटकचे कायदा मंत्री एस.के. पाटील यांनी मांडले होते. त्यामुळे आता कर्नाटकात मुख्यमंत्र्यांचा पगार 75 हजार रुपयांवरुन 1.5 लाख रुपये महिना असा होणार आहे. तसेच विधान सभा सभापती आणि विधानसभा अध्यक्षांचे वेतन 75 हजारावरुन 1.25 लाख रुपये महिना असे होईल.



### या आमदारांचे निलंबन

- डोड्डनगौडा एच. पाटील
- डॉ. अश्वथ नारायण सी.एन.
- एस.आर. विश्वनाथ
- बी.ए. बसवराज
- एम.आर. पाटील
- चन्नबसप्पा (चन्नी)
- बी. सुरेश गौडा
- उमनाथ ए. कोट्यान
- शरणु सलागर
- डॉ. शैलेन्द्र बेलदले
- सी.के. राममूर्ती
- यशपाल ए. सुवर्णा
- बी.पी. हरीश
- डॉ. भारत शेट्टी वाई.
- मुनीरथ्ना
- बसवराज मट्टीमूड
- धीरज मुनीराजु
- डॉ. चंद्रू लामानी

### चला आपला बहुजन सौरभ बलशाली करू या !

आपल्या बहुजन समाजातील महापुरूषांच्या विचारांवर आपण सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

त्यांच्या जयंती निमित्त आपण वैयक्तीक अथवा मित्रांच्या/ संस्था/संघटनेची शुभेच्छा जाहिरात स्वरूपात देऊन दैनिक बहुजनसौरभला आर्थिक सहकार्य करावे!




वर्तमानपत्रात बातम्या, लेख, कथा, कविता हवे असते तसेच जाहिराती गरजेच्या असतात हे लक्षात घेऊन आपण आपल्या कुटुंबातील सदस्याचे जयंती-स्मृतीदिन, वाढदिवस, सण, उत्सव, व्यवसाय, उत्पादने इत्यादी अनेक बाबतीत आपल्या समाजातील उद्योजक व व्यवसायिक यांनी जाहिरात देऊन किंवा जसे शक्य आहे तसे आर्थिक मदत केली तरच आपण आपलाच मिडीया बलशाली करू शकतो!

मुख्य संपादक, दैनिक बहुजन सौरभ

“ दु:खाचे डोंगर चढल्या शिवाय सुखाचे किरण दिसत नाही. ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# पुरोगामी चळवळीचा आधारवड

## प्रा. मा. म. देशमुख

ज्येष्ठ इतिहासकार व सत्यशोधक प्रा. मारोती महादेव देशमुख यांचे बुधवारी 19 मार्च रोजी वयाच्या 88 व्या वर्षी वार्धक्याने निधन झाले. मा. म. देशमुख या चिरपरिचित नावाने सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांना सारे ओळखत होते. त्यांनी आपल्या प्रगल्भ विचाराने बहुजन चळवळीत स्वतःचा वेगळा ठसा उमटविला. फुले-शाहू-आंबेडकरांचा वैचारिक वारसा पुढे नेला. समाजात सळसळती चेतना भरली. ही चैतन्याची धग चळवळीतील कार्यकर्ते आणि त्यांचे हजारो विद्यार्थी अव्याहत तेवत ठेवतील. हा विश्वास आहे.

प्रा.मा.म.देशमुख यांनी 1968 मध्ये लिहिलेल्या 'मध्ययुगीन भारताचा इतिहास' या ग्रंथावर राज्यभर चर्चित वादळ उठले व त्यांना साहित्य क्षेत्रात प्रसिद्धी मिळाली. त्यांनी यामधून आजवर न सांगितलेला खरा इतिहास सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. तो सहन न झाल्याने प्रतिगामी शक्तीने थयथयाट करून शासन दरबारी मागणी करताच या ग्रंथावर महाराष्ट्र सरकारने बंदी घातली होती; पण सत्य पुढे आणताच उच्च न्यायालयाने ती बंदी उठवली. मनुवादी या ग्रंथामुळे चांगलेच हादरले होते. छत्रपतींची शिवशाही व पेशव्यांची पेशवाई त्यांनी या ग्रंथातून साधार उलगडून दाखवली आहे. त्यांचे संशोधन पचवणे तथाकथीत भल्याभल्यांना जड गेले. म्हणून हा विरोध होता. यामुळेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अधिपत्याखाली असलेल्या हिंदुत्ववादी विद्यार्थी संघटनांनी त्यांची 'प्रेतयात्रा' काढून नागपूर विद्यापीठासमोर या ग्रंथाची होळी केली होती. याला जशास तसे उत्तर देताना बहुजन समाजातील विद्यार्थी आणि तरुण कार्यकर्त्यांनी एकत्र येत 27 जानेवारी 1969 ला प्रा. मा.म. देशमुख यांची 'प्रेमयात्रा' अर्थात गौरव यात्रा काढली. प्रस्थापितांना हा देखील जबर धक्का होता. पुरोगामी विरुद्ध प्रतिगामी विचारांचा हा लढा होता. सनातण्यांना देशमुख सरांच्या विचारांनी मात दिली होती. हा बंडखोर विचारांचा एल्गार होता. नागपूरकरांनी तो 56 वर्षांपूर्वी अनुभवला. ती साक्ष देणारे असंख्य ज्येष्ठ कार्यकर्ते आजही आमच्यात आहेत. प्रा. मा. म. देशमुख यांचे विचार आणि समस्त लेखन पुरोगामी चळवळीला सातत्याने बळ द्यायचे. चळवळीचे ते आधारवड होते. त्यांचे मार्गदर्शन 1960 च्या दशकापासून आजतागायत मिळत राहिले. अलीकडे काही वर्षांपासून ते वय परत्वे सक्रिय नसले तरी सामाजिक कार्यकर्त्यांना त्यांचा वडिलकीचा सल्ला हमखास मिळायचा. त्यांनी बहुजनांच्या जागृतीसाठी लिहिलेली व 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर प्रकाशित केलेली राष्ट्र जागृती लेखमाला खूप गाजली होती. यामध्ये 'शिवशाही', 'सन्मार्ग', 'राष्ट्रनिर्माते', 'मनुवाद्यांशी लढा', 'रामदास आणि पेशवाई', 'मराठा-कुणबी समाजाची दशा आणि दिशा' ही पुस्तके बहुजनांची मस्तके घडविण्यात उपयुक्त ठरली. त्यांनी 'मध्ययुगीन भारताचा इतिहास' जसा लिहिला तसाच 'प्राचीन भारताचा इतिहास' देखील लिहिला आहे. देशमुख सर धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर येथे इतिहास विभागाचे प्रमुख होते. इतिहासाचा विपर्यास करणाऱ्या पंडितांना त्यांनी सत्यशोधकीय पद्धतीने ऐतिहासिक घटना उलगडून दाखविल्यात. त्यामुळे ब्राह्मणी कल असणारे समर्थक अस्वस्थ होणे अपरिहार्य होते. त्यांनीच मा. म. यांच्यावर त्या काळात भरपूर तोंडसुख घेतले. परंतु सरांनी कुणापुढेही मान तुकवली नाही. कारण त्यांचा कणा संशोधकाचा होता. पिंड निर्भयतेचा होता. याच जाणीवेतून त्यांनी आपल्या लेखणीला आणि वाणीला बहुजनांच्या उत्थानासाठी अधिक धारदार केले. 'महात्मा फुले यांचे सामाजिक प्रबोधनाचे प्रयत्न' ही त्यांची पुस्तिका कार्यकर्त्यांना दिशा दाखवण्यास मोलाची ठरली. प्रा. मा. म. देशमुख आपले ऐतिहासिक संशोधन ग्रंथरूपाने शब्दबद्ध करीत राहिले. त्याचप्रमाणे व्याख्यानांच्या निमित्ताने महाराष्ट्रभर हेच सत्यान्वेषी विचार समाजात पेरत राहिले. महाराष्ट्रात असे एकही गाव नसेल तिथे मा. म. चे व्याख्यान झाले नसेल. त्यांनी आपल्या सहज सोप्या शैलीतून बहुजनांचा खरा इतिहास श्रोत्यांच्या गळी उतरविला. रामदास आणि पेशवाई यावर ते तुटून पडायचे. छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र धर्म सांगायचे. त्यांनी, 'रामदास हा शिवाजी महाराजांचा गुरु नव्हताच नव्हता, उलट तो तर औरंगजेब आणि आदिलशहा यांचा हेर होता. हे मी सप्रमाण सिद्ध करून द्यायला तयार आहे.' असे इतिहासाच्या विद्वानांना त्यांनी आव्हान दिले होते. 'रामदास हे मुधोळच्या बाजी घोरपडे यांच्याकडे आश्रित होते. तर बाजी घोरपडे हे आदिलशहाचे आश्रित होते. शिवाजी महाराजांच्या महत्त्वाच्या शत्रुंपैकी बाजी घोरपडे हे एक होते. महाराजांना त्यांना कापून काढावे लागले. जेव्हा मुधोळची जहागीर महाराजांच्या राज्यात येणे क्रमप्राप्त झाले, त्यानंतर रामदासांनी महाराजांची भाट गिरी केली.' प्रा. मा. म. देशमुख यांची सर्व पुस्तके बहुजनांच्या डोक्यात तिडीक निर्माण करणारी आहे. 'रामदासापेक्षा तुकाराम केव्हाही श्रेष्ठच.' असेही ते सांगतात. 'संत तुकारामाचा ब्राह्मणी व्यवस्थेने खून केला व सदेह वैकुंठ गमनाचा कांगावा करून त्याचा खून पचविला.' मध्ययुगीन घटनांवरचे त्यांचे भाष्य सनातण्यांच्या तोंडचे पाणी पळवते. अक्षरशः घाम फोडते. म्हणून त्यांच्या उमेदीच्या काळात प्रबोधनाच्या वेळी त्यांच्यावर अनेकदा हल्ले झालेले आहेत. प्रबोधनाच्या वारीत संघर्ष हा पदोपदी सोबत असतोच. प्रा. मा. म. देशमुख यांनी अशा संकटांची पर्वा कधी केली नाही. उलटपक्षी प्रतिगाम्यांच्या कपटनीतीवर पूर्ण सामर्थ्यानिशी ते तुटून पडले आहेत. माननीय कांशीरामजी यांच्या बहुजन समाज पक्षासाठी त्यांनी काम केले. राजकारणात हा पक्ष त्यांना आपल्या विचारांचा वाटला. या संदर्भात ते म्हणतात, 'बहुजन समाजाची प्रगती म्हणजे राष्ट्राची प्रगती होय. म्हणून मनुवादी पेशवाई मनोवृत्तीच्या पक्षांचे उच्चाटन करा. बहुजन समाजाला 'उच्चासन' मिळवून देण्यासाठी थोडा स्वार्थ बाजूला ठेवून, बहुजन शिक्षण, संघटन आणि संघर्षाच्या कार्यात तन-मन-धनाने सक्रिय सहकार्य करा.' आज राजकारणात धर्मांध शक्ती सत्तारूढ झाल्यानंतर पुन्हा मा. म. देशमुख यांच्या विचारांची तीव्र गरज भासते आहे. मराठवाड्यातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मशताब्दी समितीने महाराष्ट्रातील सात बुद्धीप्रामाण्यवाद्यांना 27 वर्षांपूर्वी पुरस्कारित केले होते. यामध्ये विदर्भातील दोन बुद्धीप्रामाण्यवादी होते. एक थोर इतिहासतज्ज्ञ प्राध्यापक मा. म. देशमुख आणि दुसरे प्रबोधनकार प्राध्यापक जैमिनी कडू सर. यांचा अभिनंदन समारंभ आम्ही काही मित्रांनी नागपूर विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात चार ऑक्टोबर 1998 रोजी घेतला. त्यासाठी एक अभिनंदन समिती गठीत करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. टी. एम. करडे होते. समारंभाचा मी संयोजक होतो. दैनिक जनवाद मधील पत्रकार, निर्भय कार्यकर्ती संध्या राजुरकर हिने सूत्रसंचालन केले. समारंभाला काँग्रेसचे ज्येष्ठ नेते टी.जी. देशमुख, खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे, अखिल भारतीय सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष वेंकटेशअण्णा रणधीर, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भालचंद्र चोपणे आदी पुरोगामी चळवळीतील मान्यवर मंडळी उपस्थित होती. या समारंभात प्रा. मा. म. देशमुख आणि प्रा. जैमिनी कडू यांचा उभयता आम्हाला शाल, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करता आला. नागपुरातील हा प्रा. मा. म. यांचा पहिलाच जाहीर अभिनंदन सोहळा होता. त्यावेळी बोलताना देशमुख सर म्हणाले होते, 'आपल्या देशात बुद्धीपेक्षा श्रद्धेला आणि देशापेक्षा देवाला फार महत्त्व आहे. देशातील सध्याची विद्यापीठे मनुवादी असून येथून मनवादी पदवीधर निघतात. मनुवाद्यांचा वाढता प्रभाव लक्षात घेता आज फुले, आंबेडकरी विचारांची विद्यापीठे निर्माण करण्याची गरज आहे. प्रत्येक जातीय दंगलीच्या मुळाशी मनुवाद्यांचा हात असतो. जोपर्यंत या जातीय दंगलीमध्ये मनुवाद्यांचे मुडदे पडत नाही. तोपर्यंत या देशातील जातीय दंगली बंद होणार नाहीत. हिंदुस्तानचे चार शत्रू सांगताना देशमुख सर म्हणाले की, आपला चौथ्या क्रमांकाचा शत्रू चीन, तिसऱ्या क्रमांकाचा युरोप व अमेरिका, दुसऱ्या क्रमांकाचा पाकिस्तान तर पहिल्या क्रमांकाचा शत्रू राष्ट्रीय स्वयंसेवक संघ उर्फ रामदासी स्वयंसेवक संघ असल्याचे त्यांनी सांगितले.' त्यावेळेचे त्यांचे उद्बोधन आजही तंतोतंत लागू होण्यासारखे आहे.यानंतरच्या काळात मा. म. सोबत सातत्याने वैचारिक सलगी वाढत गेली. सभा संमेलनातून गाठीभेटी होत राहिल्यात. वैचारिक मार्गदर्शन लाभत गेले. त्यांची पुस्तके माझ्या संग्रहालयातील ठेवा झालीत. कालच्या घटनेने पुरोगामी चळवळीतला आधारवड कोसळला असला तरी त्यांचे विचार आणि कार्य येणाऱ्या काळातही आम्हाला ऊर्जा देत राहील. आम्ही त्यांच्या वाटेवरचे वाटसरू होऊन हा अभ्युदयाचा पथ अधिक प्रशस्त करू. हीच प्रा. मा. म. देशमुखांना श्रद्धांजली असेल. ■ ■



बहुजन सौरभ

सुरेंद्र बुराडे
मो. 9860262122

## अनंतायन

# शेवाळ



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

काही माणसांना दिसतात त्या फक्त इतरांच्या चुका. जेव्हा स्वतःवर वेळ येते, तेव्हा ते सोईस्करपणे आंधळे होतात. त्यामध्ये त्यांना दोष देण्यात काहीही अर्थ नसतो. कारण त्यांचा गुणधर्म त्या कडूलिंबाच्या झाडासारखा असतो, ज्याला कितीही तेल, तूप, गुळ, साखर किंवा सहदामध्ये घोळले तरी तो त्याचा कडुपणा सोडत नाही. ह्यांना सज्जनांचा सहवास लाभला तरी त्यांच्यात कोणताही बदल तर होत नाही, उलट ते त्या सज्जनांच्या साधेपणाचा गैरफायदा घेतात. म्हणून आजकाल खूप सावध ह्यासाठी असावे लागते की, मुखवट्यामागील चेहरे सहजासहजी ओळखता येत नाहीत. आपण बरेचदा म्हणतो की हल्ली अमूक एक व्यक्ती खूप बदलली पण, वस्तुस्थिती अशी असते की, कुणीही बदललेले नसते तर त्यांच्या मुळ प्रवृत्तीचा प्रत्यय आपणाला कालांतराने आलेला असतो. अशा मनातून उतरलेल्या व्यक्तींना वेळीच दूर सारायला हवे. आपल्याला आनंदी राहायचे असेल तर ह्या माणसांशी वाद घालण्यात आपली शक्ती व वेळ वाया घालवायचा नसतो. कारण नको त्या गोष्टींचे ओझे डोक्यात ठेवले तर आपल्या आनंदयात्रेचा प्रवास त्रासदायक होतो. आयुष्यातील हे अनुभव खूप काही शिकवून जातात. चालणे तर आईवडिल शिकवतात, पण स्वतःचा तोल स्वतःलाच सांभाळावा लागतो.

एकदा ठेच लागली तर काही कटू निर्णय घ्यावे लागतात पण, निर्णय चुकला तरीही ठाम राहायला शिकले पाहिजे. स्वतःवर विश्वास असला तर हातांतून गेलेली बाजी पुन्हा जिंकता येते. आयुष्यात उतारचढाव हे येणारच. अशा वेळी फार खंबीर राहून शांततेने वाटचाल करावी लागते. म्हणून परिवर्तनाने गोंधळून जायचे नसते. आपण काही गमावले तरी त्यापेक्षाही दुसरे काहीतरी मोठे अन् चांगले कमावण्याची धमक प्रत्येकात असते. फक्त त्याची जाणीव व्हायला हवी. थोडक्यात काय तर वाईट प्रवृत्तीची माणसे ही पायऱ्यांवरील शेवाळासारखी किंवा केळीच्या सालासारखी असतात. कुणालाही पाडण्याचे त्यांचें काम ते चोखपणे पार पाडत असतात. म्हणून आपण नीट बघून जर पाय टाकला तर घसरून पडत नाही. ■ ■

# औरंग्याची कबर नव्हे हा तर शिवरायांचा पराक्रम उखाडण्याचा डाव!

**सध्या राज्यात औरंगजेबाच्या कबरीवरुन जोरदार वादंग सुरू आहे. गेल्या काही वर्षात राज्याची पुरती वाट लागली आहे. राज्यभर गुन्हेगारीचे थैमान सुरू आहे. राज्याचा गायपट्टा झाला आहे. कायदा-व्यवस्था गुन्हेगारांनी फाट्यावर मारली आहे. गुन्हेगार आणि सभागृहात कायदा करणारे मांडीला मांडी लावून फिरतायत. राज्याची अवस्था दयनीय आहे. राज्य आर्थिक आघाडीवर कंगाल होत चालले आहे. शेतकरी आत्महत्या करतो आहे. बेरोजगारीचा टक्का वाढतो आहे. महिलांच्यावरील अत्याचाराने टोक गाठले आहे. सरकार नावाची संस्था लुळी-पांगळी झाली आहे.**

सत्तेतल्या बोक्यांना याच्याशी काही देणेघेणे नाही. सत्ताधारी पक्ष प्रबळ आहे. तो कमालीचा धुर्त, कपटी, कावेबाज व कांगावेखोर आहे. त्याच्यासमोर विरोधकांनी आपल्या शेपट्या घातल्या आहेत. त्यांच्यात लढण्याचे अवसान राहिले नाही. त्यामुळेच सत्ताधारी आपले अपयश, नाकर्तेपणा लपवण्यासाठी महत्व नसलेल्या मुद्यांना समोर आणत आहेत. प्रशांत कोरटकर, राहूल सोलापुरकर यांनी छत्रपती शिवरायांचा भयंकर अवमान केला. या नालायकांची हरामखोरी आणि सरकार म्हणून असलेला आपला नाकर्तेपणा लपवण्यासाठीच औरंगजेबाला ढाल म्हणून वापरले जात आहे. खरेतर सरकारच स्वतः दंगली भडकावताना दिसत आहे. सत्तेतला पक्षच राज्यात दंगली घडाव्यात, जाळपोळ व्हावी याचे नियोजन करतो आहे. सरकारात मंत्री असलेला राणे ज्या पद्धतीने बोलतो ते पाहता सरकारच्या डोक्यात काय आहे? याचा प्रत्यय आल्याशिवाय रहात नाही. औरंग्याला कुणीही इथे मानत नाही. त्याचे कुणीही समर्थन करत नाही. या राज्यातला मुसलमान शिवरायांच्या काळातही छत्रपतींशी इमान राखून होता आणि आजही या मातीशी त्याचे इमान आहे. त्याचे इमान कधीच विकले गेले नव्हते. तसे असते तर शिवरायांच्या सैन्यात मुसलमान कधीच नसते. इथला मुसलमान तेव्हाही छत्रपतींचा निष्ठावंत होता आणि आताही आहे. अनाजीपंत आणि त्याच्या औलादींनीच शिवरायांशी आणि स्वराज्याशी गद्दारी केली आहे. राज्यातला एकही माणूस औरंगजेबाचे समर्थन करणार नाही. औरंग्याची कबर कुणी नुकतीच बांधलेली नाही. असे असताना त्याच्या कबरीचा मुद्दा करत राज्यातले वातावरण का बिघडवले जात आहे? या मागे नक्की काय कारस्थान आहे? बहुजन समाजाला याचा गांभिर्याने विचार करावा लागेल.

सरकारवाल्यांच्या डोळ्यात औरंगजेबाची कबर खुपतेय की छत्रपती शिवरायांचा अलौकीक पराक्रम? याचा शोध घ्यावा लागेल. पेशवाई मानसिकतेच्या लोकांनी आजवर कधीच शिवरायांचे महत्व मान्य केलेले नाही. नेहमीच त्यांचा मोठेपणा नाकारला आहे. एकतर त्यांच्या कर्तृत्वाला दैवी झालर देण्याचा प्रयत्न केला आहे किंवा त्यांना नसलेला गुरू जोडून ते कर्तृत्व तथाकथित गुरूकडे देण्याचा प्रयत्न केला आहे. छत्रपती शिवाजी राजे मोठे नव्हतेच. ते केवळ आमच्या जातीचे दादोजी कोंडदेव, रामदास त्यांचे गुरू होते. म्हणून ते घडले, म्हणून ते पराक्रमी, म्हणून ते शुर, जात म्हणून आमची चाणाक्ष, हुशार पंतमंडळी त्यांच्यासोबत होती. म्हणून ते मोठे असेच नेहमी लोकांच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न केला गेला आहे. पुरंदरेंनी तर बाजीप्रभू देशपांडेना मोठेपण देताना त्यांनी जे लिहीलेय ते भयंकर आहे. शिवरायांना भवानी मातेने तलवार दिली अशी भाकडकथा रचून त्यांच्या मनगटातले तलवारीचे सामर्थ्यसुद्धा नाकारण्याचा पद्धतशीरपणे प्रयत्न केला. त्यानंतर शिवरायांना अवतार ठरवत त्यांचे माणूस म्हणून असलेले उत्तुंग व्यक्तीमत्व नाकारण्याचा प्रयत्न झाला. त्यासाठी शिवरायांची मंदिरे, आरत्या वगैरे कारस्थाने रचली गेली. ऐनकेन प्रकारे शिवरायांचे मोठेपण नाकारले आहे किंवा ते इतर कुणामुळे तरी होते असे भासवण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यासाठी नाना खटपटी केल्या, नाना कारस्थाने केली. शिवरायांच्या हयातीत या भडव्यांनी त्यांना विष देवून मारलेच. पण गुडघीच्या रोगाने शिवरायांचा मृत्यू झाला अशी ऐतिहासिक थाप ठोकली. या जगात आजवर कुणीच गुडघी नावाच्या रोगाने मेले नाही. शिवरायांच्या आधीही आणि नंतरही कुणी गुडघीच्या रोगाने मेलेले नाही. जसे संत तुकोबारायांच्या आधीही कुणाला विमानाने वैकुंठाला नेले नाही आणि त्यानंतरही कुणाला नेले नाही. त्याप्रमाणेच छत्रपती शिवराय सोडून कुणीच सदर रोगाने मृत्यू पावले नाही. केवळ महाराष्ट्राच्या, भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात असा रोग कुणालाच झाला नाही, कुणीच त्या रोगाने मेल्याची कुठेही नोंद नाही. असे असताना या पाजी हलकटांनी ती थाप इतिहासात घुसडली आणि लोकांच्या डोक्यात उतरवली. त्यानंतर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी राजे यांचीही घातपाताने हत्या करण्याचा अनेकवेळा प्रयत्न केला. शेवटी त्यात त्यांना यश आलेच. औरंगजेबाला हाताशी धरत याच कारस्थानी भडव्यांनी शंभूराजांची हत्या घडवून आणली आणि ते खापर शंभूराजांच्या मेहूण्यांच्यावर फोडले. यांच्या हातात लेखण्या होत्या त्याचा पुरेपुर वापर करत हे कारस्थानी भामटे इतिहासाला डसले. त्यांच्या लेखणीरूपी नागिनीच्या दंशाने बहुजनांच्या अनेक पिढ्या बरबाद केल्या. शिवशाही नष्ट झाल्यानंतर शिवरायांची समाधी उपेक्षित होती. महात्मा फुलेंनी रायगडावर जाऊन ती शोधली व स्वच्छ केली. शिवरायांची समाधी शोधून काढल्यावर महात्मा फुलेंना पुण्यातल्या जातीयवादी भटांनी शिव्यांची लाखोली वाहिली. 'कुणबटाचा राजा' म्हणून हे कारस्थानी बावळे शिवाजीराजांना हिनवत होते. त्यानंतर जेव्हा या रयतेच्या राजाचा पुतळा पुण्यात उभा करायचा होता, तेव्हा पुण्यातले जातीयवादी सदाशिवपेठी ब्रम्हवृंद चवताळून उठले. शिवरायांचा पुतळा पुण्यात होवूच नये यासाठी कडाडून विरोध केला. पुतळा तयार करणाऱ्या शिल्पकाराला धमकावले. पेशवाई किड्यांच्या डोक्यातला शिवरायांच्याबद्दलचा द्वेष आणि आकस जगजाहिर आहे. तो आजचा नाही. यात नवीन काय नाही. गेल्या चारशे वर्षापासून हा द्वेष या मंडळींच्या पोटात वाढतो आहे. हा द्वेष कोरटकर सारख्या हरामखोरांच्या पोटातून ओठावर अधूनमधून येतो. शिवरायांच्या हयातीत त्यांचे महत्व नाकारलेच. त्यांचा राज्याभिषेक नाकारला. 'कोण राजा? तु कसा आमचा राजा? तु तर शुद्र! असे म्हणत त्यांना हिनवले. त्यानंतर आजतागायत शिवरायांचे मोठेपण नाकारले. इतर गोष्टींना महत्व देत, त्यांच्या कर्तृत्वाला दैवी झालर देत, चमत्काराची बेगड लावत शिवरायांच्या मोठेपणाला जाणिवपुर्वक बगल देण्याचा प्रयत्न केला गेला. गेल्या चारशे वर्षात या बांडगुळांच्या कारस्थानांना यश आले नाही. राजे या बांडगुळाना पुरून उरले आहेत. अखेर कपटी कावळ्यानी शिवरायांना स्विकारल्याचे नाटक करत त्यांचा जयजयकार करत त्याना संपवण्याचे कारस्थान रचले आहे. त्यांच्या नावाने दंगली घडवत राजकीय सत्ता मिळवण्याचे त्यांना साधन केले. त्यांना मुस्लिम द्वेषाचा ब्रँड करत संकुचित करण्याचे कारस्थान रचले गेले आहे. त्यांचे अफाट कर्तृत्व आणि रयतेसाठीची ऐतिहासिक धोरण दुर्लक्षित करत त्यांचा पराक्रम केवळ कोथळा काढला, बोटे तोडली इतकाच मर्यादीत ठेवण्याचा प्रयत्न केला. शिवरायांना संपवण्यासाठी जेवढे औरंग्याने जंग जंग पछाडले नाही त्यापेक्षा जास्त या जातीयवादी पेशवाई किड्यांनी जंगजंग पछाडले आहे. छत्रपती शिवाजी राजांचा मृत्यू झाल्यानंतर औरंगजेबाने भर दरबारात शिवरायांच्यासाठी नमाज पढल्याचे पुरावे आहेत. पण या पेशवाई नालायकांनी आजवर आपले मनसुबे सोडलेले नाहीत. ते आणि त्यांच्या कंपूतले लोक सतत शिवरायांचा अवमान करत आलेत. 'बंच ऑफ थॉट' मध्ये आपल्या वैचारिक हागणदारीची साक्ष देत माधवराव गोळवळकराने जी घाण केली आहे, सावरकर जे बोलले आहेत ते सगळे यांच्या मनातली द्वेषभावना दाखवणारे आहे. गोळवळकर, सावरकर यांच्यापासून जेम्स लेन, श्रीपाद छिंदम, कपाळावर जखम असलेला पुतळा तयार करणारा नमकहरामी, राहूल सोलपुरकर ते कोरटकर अशी यांच्या नमकहरामीची मोठी यादीच आहे. शिवरायांना संपवणे हेच या हरामखोरांचे ध्येय आहे. या जातीयवादी पेशवाई किड्यांचे ते ध्येय अजून संपलेले नाही. आताही त्यांना औरंग्याची कबर उखाडून काढायची नाही. औरंग्याची कबर उखाडणे हा त्यांचा दावा आहे पण शिवरायांचा पराक्रम, अफाट कर्तृत्व आणि मोठेपण उखाडून काढणे हा त्यांचा खरा कावा आहे. औरंग्याची कबर, अफझुल्ल्याचा दर्गा या शिवरायांच्या कर्तृत्वाच्या खुणा आहेत. त्यांच्या शौर्याची ही प्रतिके आहेत. असे नसते तर छत्रपती शिवरायांनी अफझलखानाची समाधी बांधली नसती. जिजाऊ मातेने शिवरायांना तसे सांगितले नसते. याचा तरी भटांच्या कच्छपी लागलेल्या बहुजन बावळ्यांनी विचार करावा. आपला बाप कोण? त्याने काय केले? आपल्या उक्तीतून आणि कृतीतून त्याने काय सांगितले याचा विचार हे बावळे करतील का? औरंग्याची कबर, अफझुल्ल्याची समाधी काढली तर शिवरायांच्या पराक्रमाचे पुरावे म्हणून काय दाखवणार? शिवरायांचे वंशज म्हणवणारे लोकही इतके कसे सत्तेच्या धुंदीत बेफाम झाले आहेत? त्यांचा सदसदविवेक ठार मेला आहे की काय? बहुजन समाज या पेशवाई किड्यांचा इतका गुलाम कसा काय झाला आहे? पेशवाई किड्यांनी यांच्या हातावर विष्ठा ठेवली तरी हे प्रसाद म्हणून हजम करत आहेत. यांच्या अकलेला नारू झालाय की कॅन्सर? नेमके काय झालेय? जन्माला आलेले बाळ न शिकवता आपल्या आईचे स्तन्य पिते. त्याला तेवढी अक्कल असतेच पण हे गायीला माता म्हणत बैलाला बाप म्हणून स्विकारणारे बावळे कधी सुधारणार? अजून किती काळ बैलाच्या कासेत ढोसण्या मारणार आहेत? काल-परवापर्यंत संघाला व फडणवीसांना शिव्या देणारे नितेश राणे आज त्याच फडणवीसांच्या मांड्या चोळत आम्हाला शिवचरित्र आणि हिंदुत्व शिकवणार काय? फंद-फितुरीचा शाप लाभलेला, सत्तेसाठी मोघलांपासून पेशव्यांचे तळवे चाटणारा बहुजन समाज शिवचरित्रातून नेमके काय शिकला? हा न सुटणारा प्रश्न आहे. ■ ■





बहुजन सौरभ



दत्तकुमार खंडागळे
मो. 9561551006

# लेखन का व नंतर काय?

दैनिक बहुजन सौरभ ला प्रकाशित होवून चार वर्षे झालीत. पाचवे वर्ष सुरू झाले. या कालावधी मध्ये दुसऱ्या व तिसऱ्या पानावर अनेक मान्यवरांचे लेख, कविता आदी असतात. महत्वपूर्ण विषयावरील माहिती प्रकाशित झाली. मन पेटविणारे, चेतविणारे, वैचारिक प्रबोधनात्मक, शैक्षणिक, ऐतिहासिक लेखाची भरमार असते. वाचा ला दिवस कमी जातो. समाजातील बहुतांश शिकलेल्या समझदार व्यक्तींची मानसिकता ही 'भाड मे जाय जनता अपना काम बनता' अशी असते. आंबेडकरी समाजासमोर प्रचंड समस्या आहेत. रोजगार, शिक्षण, लोकशाहीत संविधानची वाट लागलेली आहे. गटा-गटाच्या गटारगंगेत नेत्यांबरोबर कार्यकर्ते ही वाहून जात असल्याने आपली राजकीय ताकत नगण्य झाली आहे. त्यामुळे ना शासन, ना प्रशासन ना जातियवादी, ना भाजप, ना काँग्रेस, ना शिवसेना, ना मोठया खाजगी कंपन्यांवर धाक राहिलेला आहे. सत्ता ही सर्व बाबींची गुरुकिल्ली असल्याची चर्चा आहे.

नेते तर नालायक आहेत पण समाजातील पांढरपेशे ही कमी बदमाश आहेत? सन 1925 ला आर.एस.एस. ची स्थापना झाली. ब्राह्मण पांढरपेशा नोकरदार आज सतर्कतेमुळे सावध आहे. त्याचे म्हातारे सायंकाळच्या वेळेला चावडीवर बसून, राजकीय विश्लेषण करतात. नाना जोशीला घरची वाट दाखविली. गोविंदाचार्यला बाहेर फेकले. अडवाणीला आडगावात टाकण्यात आले. आर.एस.एस.चे शिस्तबध्द काम, त्यांची यंत्रणा, देशभर जाळे यामुळे 100 वर्ष पुर्ण होत असूनही आर.एस.एस.चे आणिबाणीत ही बाल-बाके झाले नाही. आमचे साहित्यिक, विचारवंत व नोकरदार, पांढरपेशे आम्ही आमच्या नेत्यांना वेसन लावू शकलो नाही. हिच खरी गोम. समाज आज अस्वस्थ आहे. निराश आहे. भाजपा, कांग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादीच्या नेत्यांची मुले, मंत्री, खासदार, आमदार झाले. आंबेडकरी अंगार असलेला समाज इतर वंचित समाजा सारखा गप्प झाला आहे विचारमंथन झाले पाहिजे हीच माझी अपेक्षा आहे.

आंबेडकरी समाजातील जयंत्या, पुण्यतिथी, अधिवेशने, परिषदा, सभा, सम्मेलने हे तुकाराम मानेच्या शब्दात 'ईव्हेन्ट' झालेले आहेत. आंतरराष्ट्रीय महिला दिन नुकताच साजरा झाला पण सौदी अरेबियाची 'लुजैन अल-हाथलूल' सारख्या स्त्रियांच्या डोळ्यात अंजन घालणारी एखादी महिला येईल का आज आपल्या समाजाला गरज आहे ती मॅग्ना चार्ट, फ्रेंच राज्यक्रांती, रशिया व चीनची माओ क्रांती याकरीता कमीत कमी लिखाण करणाऱ्यांची प्रकाश पडला पाहिजे. 'रणजित मेश्राम' सोबत आपण सर्वांनी 'अप्लाईड आंबेडकर' चे पालन करावे हीच विनंती. मी. महानगरपालिका निवडणुक यावर 'विचार मंथन परिषद' मार्च-एप्रिल मध्ये आयोजित करीत आहे. मार्चच्या शेवटपर्यंत या विषयावर दोन पानी आपले लेखी विचार पाठवावे. आपणास 10 मिनिटे बोलण्याची संधी मिळेल. चला महापालिका एकत्र आणि समूहाने निवडणूकीला समोर जाऊ. ■ ■

बहुजनांच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीचे एकमेव दैनिक बहुजन सौरभ



ॲड. सुरेश घाटे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रा.स्व. संघ आणि आम्ही लोक



बहुजन सौरभ

**आरएसएस आणि शक्तिशाली नेतृत्वाचा भ्रम :-** कोणी असे म्हणू शकतो की, आरएसएस भारताला 'विश्वगुरू' बनवित आहे. मात्र, हा एक अर्धसत्य व साफ खोटा दावा आहे. जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती भारतीय असला पाहिजे, असे म्हणत आरएसएसच्या मोदींनी भारतात अमृतकाळ सुरू झाल्याची घोषणा केली आहे. अमेरिकन फॅसिस्ट डोनाल्ड ट्रम्प यांनाही 'मेक अगेन ग्रेट अमेरिका' बनवायची आहे. त्यांनी दुसऱ्यांदा अध्यक्षपदाची शपथ घेतल्यावर अमेरिकेत 'गोल्डन एरा' (सुवर्ण युग) सुरू झाल्याची घोषणा केली आहे. तर रशियाचा अध्यक्ष ब्लादमीर पुतीन आणि चीनचा शी जिनपिंग यांना त्यांचे-त्यांचे देश जगातील 'सुपर पॉवर' बनवायचे आहेत. तुर्कीचा हुकूमशहा रेचप तय्यप अर्देऑन याने तुर्क जनतेना चौदाव्या शतकातील जगावर राज्य करणारे ऑटोमन साम्राज्य निर्माण करण्याचे स्वप्न दाखवले आहे. उत्तर कोरियाचा हुकूमशहा किम जोंग उन याचे वेगळेच मनसुबे आहेत. हे सर्व सनकी हुकूमशहा जगावर राज्य करण्याची मनिषा बाळगत असल्याने त्यांचे स्वार्थ एकमेकांशी स्पर्धा करताना, त्यांच्यात 'हिताचा' संघर्ष निर्माण होणार आहे. तो संघर्ष ट्रम्पने जन्मसिद्ध नागरिकत्व कायदा रद्द करण्यावरून आरएसएस व मोदी यांच्यासोबत सुरू झाला आहे. स्वतः ट्रम्पचे पूर्वज जर्मनीतून आले आणि तेथील रेड इंडियन लोकांवर अतिक्रमण केले होते. स्वतः उपऱ्या असलेल्या सनकी ट्रम्पने हा निर्णय घेतला आहे. या सनकी हुकूमशहांपैकी कोणी एकाने जगावर राज्य करायचे म्हटले तर दुसऱ्यांशी युद्ध करावेच लागेल. जसे औरंगजेबाने मोगल साम्राज्याची सत्ता हस्तगत करण्यासाठी आपल्या सख्ख्या भावांशी लढाया करून त्याचे खून केले होते. हे मगधच्या मौर्य आणि राजस्थानच्या राणा राजघराण्यातही घडले होते. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास तुम्ही विसरलेले नसाल. तेव्हा कोणी दुष्ट व कपटी व्यक्तीच फॅसिझममध्ये सकारात्मता शोधणार आणि म्हणेल की, फॅसिझम देश व समाजाला शिस्त लावतो, जसे आता भारत, तुर्कस्थानात सुरू आहे. देशात उत्पादन वाढते, देशाचा जगात गौरव वाढतो. देश शक्तिशाली बनून विश्वगुरू बनतो. प्रत्यक्षात एक वेडा व्यक्ती एवढा शक्तिशाली बनतो, की त्याने दुसऱ्या कोणाला इजा पोहचवू नये, याकरिता चार-पाच लोक त्याला नियंत्रित करीत असतात. अशा वेड्या व्यक्तीला शक्तिशाली आहे, असे म्हणत कोणी त्याचा गौरव करीत नाहीत. शक्तिशाली पागल व्यक्तीपासून समाजाचे रक्षण करण्याकरिता त्याला साखळदंडाने बांधून ठेवले जाते.

पागल व्यक्तीच्या मेंदूमधील संप्रेरकांमध्ये बदल होत असल्याने तो सर्वसामान्य व्यवहार करीत नसतो. मानसिक आजाराचे डॉक्टर अशा पागल माणसाने चांगले वर्तन करावे, याकरिता मेंदूमधील संप्रेरकांचे (डोपामाईन, ऑक्सिटोसिन, सेरोटोनीन, टेस्टोस्टेरॉन आदी रसायने) प्रमाण संतुलीत करीत असतात. जसे रक्तामधील साखरेचे प्रमाण वाढले की, ती व्यक्ती चीड-चीड करते, भांडण करण्यास उद्युक्त होते. त्यामुळे रक्तातील साखर संतुलीत करण्यासाठी इन्सुलीन या औषधीचा डोस दिला जातो. मानवी मेंदूमध्ये जाणीव जागृतीशी संबंधित चार घटक सक्रिय आहेत. त्यामध्ये भावना प्रक्रिया व संवेदी केंद्र, नेणीव व संस्थात्मक स्मृती, पूर्वजाणीव आणि जाणीव केंद्र हे मनुष्याचे वर्तन नियंत्रित करीत असतात. हे चारही घटक असलेली न्यूरॉन्सची किचकट रचना मेंदूमध्ये तयार झाली आहे. त्यामधून जे उत्पन्न होते त्या कल्पना आणि विचार माणूस अनुभवत असतो. मानसशास्त्रज्ञ सिग्मंड फ्राईडच्या मते, माणूस मनाने स्वतंत्र नसतो. तो जाणीव, नेणीव, सहज प्रवृत्ती आणि सुपर इगोने नियत असतो. फ्राईडने माणसाच्या मेंदूत तर्क, विवेक करण्यासह अंधश्रद्धा निर्माण करणाऱ्या अतार्किक गोष्टी असल्याचे सांगितले आहे. मनुष्य प्रत्येक वेळी तर्काधिष्ठित विचार व कल्पना व्यक्त करेलच, असे नाही. या मानसशास्त्रीय गोष्टींचा वापर करून समाजात उन्माद, द्वेष, भीती, दहशत निर्माण करण्याकरिता फॅसिझममध्ये खोट्या गोष्टींचा प्रोपोगंडा केला जातो. धार्मिक, जातीय, वांशिक पॉप्युलिझमच्या माध्यमातून भावनिक शोषण करून लोकांना झुंडीमध्ये परावर्तीत केले जाते. हे खूप शास्त्रीय व नियोजनबद्ध पद्धतीने केले जाते. सामान्य हिंदूंच्या मनात दलित, आदिवासी, मुसलमान, ख्रिश्चन यांच्याविषयी खोट्या गोष्टींच्या प्रोपगंडाद्वारे झेनेफोबिया निर्माण केला जातो. त्याकरिता आरएसएसकडे लाखों स्वयंसेवकांची ट्रोल गँग आहे. या मानवी स्वयंसेवकांच्या जोडीला आता ग्लोबल कार्पोरेट कंपन्यांच्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानयुक्त व्हॉट्सअॅप, फेसबुक, यूट्यूब, ट्विटर (एक्स), टेलिग्राम आदी सोशल प्लेटफार्मचा वापर केला जातो. 2014 आणि 2019च्या लोकसभा निवडणुकीत अमेरिकन मार्क झुकेरबर्गचे 'फेसबुक', अमेरिकेतील आयटी सेक्टरमधील हिंदू स्वयंसेवक संघ समर्थक 'मूव्हऑन डॉट ऑर्ग' आणि 'रेस पब्लिका' यांनी मिळून स्थापन केलेले 'आवाज डॉट ऑर्ग', अरविंद गुप्ताचे इंटनेटवरील 'युवा टीव्ही' चॅनेल, मुंबई येथील उद्योजक राजेश जैन यांची 'नेटकॉम सोल्यूशन', बंगळुरू येथील बी.जी. महेश यांचे 'इंडिया272 डॉट कॉम' हे पोर्टल, अमेरिकेतील संघ स्वयंसवेकांच्या ऑनलाइन संघटना 'सेंटर राइट इंडिया', 'इंडिया बिहाईंड द लेन्स' आदींच्या माध्यमातून आरएसएसने डिजिटल प्रोपगंडा करून 'आभासी अजेंडा' तयार केला. भारतीय निवडणुकीसाठी अजेंडा सेटिंग करण्यामध्ये देश व विदेशी डिजिटल संस्था, संघटनांनी हस्तक्षेप केला. त्यासोबत कॅगच्या मॅनिप्युलेट केलेला कथित भ्रष्टाचार रिपोर्टचा बागूलबुवा उभा करून आणि त्यावर आधारित फेक न्यूजचा प्रोपगंडा करून 2014च्या निवडणुकीचा अजेंडा सेट करण्यात आला. त्या अजेंड्याला सामान्य लोकांची सहमती तयार करण्यात आली, सहमती घडविण्यात आली. मॅनिप्युलेट केलेला रिपोर्ट तयार करणाऱ्या तत्कालीन कॅगप्रमुख विनोद रॉयने 2021मध्ये माफी मागितली आहे. सोशल मीडियावरील प्रोपगंडाच्या आधारे नागरिकांचे स्वातंत्र्य अपहरणासंदर्भात अमेरिकन निवडणुकीच्या अनुभवावरून सॅम्युअल सी. वूली आणि डग्लस गिलबिल्ट म्हणतात, की मागील संशोधनातून असे दिसून आले आहे, की युनायटेड स्टेट्स आणि परदेशातील सोशल मीडियावरील मोहिमांनी राजकीय उमेदवार व जनमतामध्ये फेरफार करण्याच्या प्रयत्नात स्वयंचलित सॉफ्टवेअर उपकरणांचा वापर करण्यात आला आहे.

**सत्ताधारी कुलीन वर्गाची बंडखोरी आणि तंत्रज्ञानाचे भ्रमजाल :-** 1990 पासून सर्वसामान्य लोकांविरोधात जागतिकीकरणाचे षडयंत्र तयार करण्यात आले आहे. हे समाजातील उच्चभ्रू कुलीन वर्गाने सर्वसामान्य लोकांविरोधात केलेले बंड आहे. त्याकरिता त्याच कालावधीत लोकांमध्ये भ्रम (व्हर्च्युअल रिॲलिटी) निर्माण करणाऱ्या माहिती तंत्रज्ञान, इंटरनेट आणि पुढील काळात आर्टिफिशिअल टेक्नॉलॉजीचा (एआय) वापर वाढविण्यात आला आहे. मनाला आकर्षित करणारे व्हर्च्युअल रिॲलिटीचे, मेटाव्हर्सचे मायाजाल लोकांना आपल्या जाळ्यात ओढते. एखाद्या मेटा इंक, एक्स कॉर्प, अल्फाबेट इंक आदी ग्लोबल कॉर्पोरेट कंपन्यांचा मालक 10 बाय 10 च्या एसी खोलीत बसून जगाला नाचवत असतो. तो आपले तंत्रज्ञान (पेगासिस आदी) सत्ताधारी कुलीन वर्गाला विकतो. फॅसिस्ट संघटना त्या तंत्रज्ञानाचा वापर करून समाजात झेनोफोबिया निर्माण करतात. झेनोफोबिया व नार्सिसिझम यांचा एकत्र वापर केला की, लोकांना उन्मादी झुंडीमध्ये बदलणे शक्य होते. ■ ■



मिलिंद कीर्ती
मो. 9405325048

## वाचकांचे मनोगत

बहुजन सौरभ

# राष्ट्रसेवेचे सुगम रहस्य

वास्तविक आपले घर सांभाळणे किंबहुना आपला देह सांभाळणे ही सुद्धा राष्ट्रसेवाच आहे; पण या घराचा हा देहाचा कार्य ओघ व्यक्तित्वात गुंतवून न ठेवता किंवा आपल्या दैहिक सुखाकडेच न वळवता तो सर्वांच्या बऱ्याकडे आम्हास लावता आला पाहिजे. पतिपत्नींनी परस्परास मोहात बद्ध करून ठेवण्याची धडपड करण्याऐवजी आपल्या जोडीदारातील उणीवा व दोष शक्य त्या प्रयत्नांनी दूर करुन परस्परास तारक बनले पाहिजे. गृहस्थाश्रम हा एक पवित्र आश्रम आहे ही गोष्ट सदैव ध्यानात बाळगून, आपले कार्य व्यक्तिगत उन्नतीबरोबरच विश्वधर्माला पोषक मानवधर्माला भूषणावह असे झाले पाहिजे याची उभयतांनीही काळजी वाहिली पाहिजे. असे झाले म्हणजे त्यांच्याकडून राष्ट्रसेवा पूर्णपणे घडली आणि त्यांचा संसार साररुप बनला असे मला वाटते.

– डी. एन. लाखे
मो. 9422921286

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



## महत्वाचे

### महाड चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**नागपूर :** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया भारतीय बौद्ध महासभा नागपूर महानगर जिल्हा शाखेच्या वतीने 20 मार्च 1927 रोजी महाड चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्ताने संविधान चौक नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन, पुष्पहार. भारतीय बौद्ध महासभेचे माजी शहर अध्यक्ष व जिल्हा कोषाध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा नागपूर महानगर जिल्हा शाखा यांच्या प्रमुख उपस्थितीत पुष्पहार अर्पण करण्यात आले, यावेळी प्रामुख्याने उपस्थित पंचशीला सहारे, अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा नगर शाखा लष्करीबाग हरदास नगर उत्तर नागपूर, गीता जांभूळकर कोषाध्यक्ष, रमा सोमकुवर सदस्य, प्रिती नगरारे, आनंद सायरे, नरेश वाहाणे, गोविंद वाघमारे, सुरेश लोखंडे, सिद्धार्थ मेश्राम, सुधिर ढोके, राजु डोंगरे, मिलिंद रामटेके, जनार्दन देशपांडे, इत्यादी मोठ्या संख्येने कार्यकर्ते, कार्यक्रमात उपस्थित होते.

### स्मृतिशेष दशरथ पाटील यांना स्मृतिदिनी अभिवादन



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वासु म्हणून ज्यांची ख्याती प्राप्त असलेले, तहसील उमरेड विधान क्षेत्रातील बेला येथील कडाजना स्मृति स्थलावर, स्मृति दशरथ पाटील बहुउद्देशीय विकास संस्था तर्फे स्मृतिदिन कार्यक्रम झाला. मंचावर सुनील सारिपुत्र, कार्यक्रमाचे उद्घाटक भंते कुशल धम्म सुनतरि, संस्थाचे अध्यक्ष पुष्पा त्रिलोक हजारे, डॉ. भीमराव म्हस्के, सुजाता भोंगाडे, सविता घोडे व धम्मदीना पवार, वसंतराव कांबले उपस्थित होते. आंबेडकरी चळवळ आणि बौद्धांची अस्मिता, या विषयावर चर्चा सत्रांत अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थाचे वसंतराव कांबले यांनी केले, तर कार्यक्रमाचे संचालन डॉ. रामभाऊ वाने यांनी केले. या कार्यक्रमात डॉ. त्रिलोक हजारे, डॉ. प्रभाकर मुन, वासुदेव कांबले, मिलिंद मेश्राम, विशाल नंदा, विठ्ठलराव नारायने, चंद्रप्रभा मिलिंद मेश्राम, डॉ. शिल्पा नंदा, बाबाराव कांबले, अभिनव गोडघाटे, मिलिंद सातकर, सूरज कांबले, चंद्रमणी माते, स्वप्निल कवाडे, नीलम जवादे, सुरेश शेवाले, अरुण ढोबले, आशा मेंढे, पुष्पा कांबले, रंजना कांबले, सुगंधा वानखेडे, अनीता नानवते, चंद्रकला मानकर, विशाल म्हैसकर, विठोबा नरांजे, शैलेश नानवते, अजय कांबले, ममता तामगाडगे, रोशन लोखंडे, ऋषि लोखंडे, नितेश शंभरकर इत्यादी धम्म उपासक उपस्थित होते.

### दुचाकी वाहनांसाठी सर्विस रस्त्यांचा विस्तार करून विशेष लेन तयार केल्या पाहिजे : मागणी



**नागपूर :** सामाजिक कार्यकर्ते इबादुल सिद्दीकी उर्फ जनहितशी यांनी नागपुरात केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून देशभरात होणाऱ्या अपघातात लाखो लोकांचे प्राण वाचवण्यासाठी राष्ट्रीय व राज्य महामार्गावर दुचाकी वाहनांसाठी सर्विस रस्ते वाढविण्याची मागणी केली. विशिष्ट लेन तयार करण्यासाठी सिद्दीकी यांनी गडकरींना नम्र विनंती केली की, भारतभर रस्ते वाहतुकीमध्ये चारचाकी वाहने आणि मोठे ट्रक, लॉरी आणि मोठे मोठे ट्रक चालत असल्याने दुचाकी वाहनांच्या अपघातांचे प्रमाण सर्वाधिक आहे. दहा लाखाहुन अधिक लहान दुर्घटना होते. यामध्ये 19 ते 35 वयोगटातील नवयुवक युवतींचा 65 टक्के दुचाकी स्वारांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे अशा अपघातांना आळा घालण्यासाठी राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांच्या सर्विस रस्त्यांचे विस्तारीकरण करणे आणि रस्त्यालगत दुचाकी वाहनांसाठी खास लेन स्वतंत्र लेन तयार करणे आवश्यक झाले आहे. सार्वजनिक हितासाठी, राष्ट्रीय आणि राज्य महामार्गावरील विशेष लेन दुचाकी चालकांसाठी उपयुक्त ठरतील आणि लाखो लोकांचे प्राण वाचतील. केंद्रीयमंत्री नितीन गडकरींनी या सूचनेची दखल घेऊन येणाऱ्या काळात त्याचा गांभीर्याने विचार केला जाईल. असे आश्वासन दिले. नागपुरात नितिन गडकरींची प्रत्यक्ष भेटून निवेदन देऊन विनंती केली होती.

### समता सैनिक दलाचा 98 वा स्थापना दिवस साजरा



**नागपूर :** समता सैनिक दल दीक्षाभूमी नागपूरच्या वतीने समता सैनिक दलाचा 98 वा स्थापना दीक्षाभूमी येथे साजरा करण्यात आला. महाड येथे 19 मार्च 1927 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता सैनिक दलाची महाड क्रांती दिना निमित्त स्थापना केली होती. या वर्षी त्याला 98 वर्ष झाले. त्या निमित्त दलाच्या वतीने शेकडो सैनिकांच्या सहभागातून मार्चपास करून दीक्षाभूमीला अभिवादन करून सलामी देण्यात आली. दलाचे शताब्दी वर्ष 2027 मध्ये दहा हजार दलाचे सैनिक तयार केले जातील, अशी घोषणा दलाचे प्रमुख संयोजक घनश्याम फुसे यांनी केले. याप्रसंगी राजरतन कुंभारे, शामराव हाडके, शरद मेश्राम, प्रा.पी.एस. मेश्राम, नागेश बडगे, डॉ. माधव नंदेश्वर, प्रा. अनिल भांगे, कमान्डर जितेंद्र घोडेस्वार, महिला कमांडर धनमाला गोंडाने, लक्ष्मी शेंडे, शीला गजभिये, शीला रंगारी यांनी सभेला मार्गदर्शन केले. दलाचे सैनिक सुनील गजभिये, राजू मून, रवींद्र भगत, राजेश माटे, अश्विन फुसे, नितीन सोमकुवर, महिपाल सांगोळे, सुनील डांगे, सिद्धार्थ चहांदे, रोशन चौहान, अनमोल खोब्रागडे, हेमचंद्र उके, अशोक रामटेके, अशोक डांगे, दामोदर वानखेडे, भीमराव बिसांद्रे, दामले, पद्मा नंदेश्वर, भावना मेश्राम, भगवान कांबळे, ध्यानेश्वर गौरकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यास प्रयत्न केले.

# उपाय सापडतो, फक्त विचार करण्याची गरज आहे : डॉ. भीमराव गोटे

## महाड सत्याग्रह स्मृती दिनानिमित्त डॉ. आंबेडकर अध्ययन आणि विचारधारा विभागाचा उपक्रम

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब महाड सत्याग्रहानंतर थांबले नाहीत. ते पुढे गेले. संपूर्ण भारत बौद्धमय करणे आणि शासनकर्ता समाज म्हणून उभे राहणे, हे त्यांचे ध्येय होते. आपल्याला याचा गांभीर्याने विचार करावा लागेल. विचार करायला हवा की, आज डॉ. बाबासाहेब असते तर त्यांनी काय केले असते? आपण एका नेतृत्वाखाली यायला हवे. समाज एकत्र कसा येईल, यावर विचार करावा लागेल. एकमेकांचे ऐकण्याची क्षमता निर्माण करावी लागेल. जर नेतृत्वाचे ऐकू शकत नसेल, तर एक मंडळ तयार करून सामूहिक निर्णय घ्यावा लागेल. उपाय सापडतो, फक्त विचार करण्याची गरज आहे. विचार करा आणि इतरांनाही विचार करण्यास प्रवृत्त करा, असे प्रमुख वक्ते डॉ. भीमराव गोटे



म्हणाले. 98 व्या महाड सत्याग्रह स्मृती दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात पदव्युत्तर शिक्षण विभागाचे माजी प्रा. डॉ. भीमराव गोटे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड सत्याग्रहाच्या आठवणींना उजाळा देत त्याचा सध्याच्या परिस्थितीशी संबंध जोडला. महाड सत्याग्रहाच्या 98 व्या स्मृती दिनानिमित्त गुरुवारी नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्ययन आणि विचारधारा विभागाने 'महाड सत्याग्रह - स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे प्रतीक' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. अविनाश फुलझेले होते.

डॉ. गोटे पुढे म्हणाले, 'चवदार तळ्याचा पाणी पिण्याचा सत्याग्रह हा केवळ पाण्यासाठी नव्हता. तो आपणही माणूस आहोत, हे दाखवण्यासाठी होता. आज पुन्हा अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. उदारीकरणाच्या नावाखाली आधी खाजगी उद्योग विकले गेले, नंतर सरकारी उद्योगांचे खासगीकरण झाले. आता सरकारी नोकऱ्याच संपत चालल्या आहेत. ज्यांच्याकडे साधनसंपत्ती आहे, ते त्यांच्या मुलांना शिकवू शकतील. पण नोकऱ्याच नसेल, तर पुढे काय? शिक्षणाची दारे बंद होतील, उद्योगधंदे राहणार नाहीत. अशा परिस्थितीत पदवीधर होऊन कोणी शिपाईची नोकरी थोडीच करेल? यावर उपाय शोधायला हवा.' कार्यक्रमाचे अध्यक्षीय विचार डॉ. अविनाश फुलझेले यांनी मांडले. संचालन दिलीपकुमार लेहगांवकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. वनिता मेश्राम यांनी केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्धिस्ट सेमिनरी, उंटखाना येथे 334 वी धम्मसंगोष्टी

**नागपूर :** जगातील अनेक देशात बौद्ध धम्म अस्तित्वात असला तरी वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या स्वरूपाचे कर्मकांड आहेत. त्यापैकी बहुतांश देशात अलौकिकवादाचे प्राबल्य आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला भारतातील धम्म शुद्धबुद्ध आहे, विज्ञानवादी आहे. 2500 वर्षांपूर्वी बुद्धांनी दुःख आणि दुःखाची कारणे सांगितली आहेत. मानवी जीवनातील तृष्णा, अहंकार व अज्ञान ही दुःखाची कारणे आहेत. मैत्री व प्रेम असेल तर जग जिंकता येते, द्वेषाने द्वेष वाढत जातो. आज कौटुंबिक आणि सामाजिक समस्या वाढल्या आहेत. धम्माच्या सान्निध्यात असल्यास वाईटात वाईट व्यक्तीतही परिवर्तन होऊ शकते. पूजाअर्चा करून काही प्राप्त होत नाही. त्यासाठी धम्मात दिल्याप्रमाणे नैतिक जीवन जगले पाहिजे. समाजातील समस्यांचे निराकरण कसे करता येईल, याचा विचार केला पाहिजे, असे विचार धम्मसंगोष्टीच्या सभेत प्रमुख वक्ते आणि बुद्धीस्ट सेमिनरीचे संचालक भदंत धम्मसारथी यांनी व्यक्त केले. आज डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना नष्ट करण्याचे प्रयत्न




केले जात आहेत. त्यासाठी आपण सतर्क असले पाहिजे. निरंतर समाजकार्य करणारे कधीच थकत नाहीत, असे विचार भंते राहुल बोधी यांनी व्यक्त केले. दीक्षाभूमी अंतर्गत स्थापित 'बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्धिस्ट सेमिनरी, उंटखाना' येथे 334 वी धम्मसंगिती आयोजित केली होती. एकेकाळी ही सेमिनरी अत्यंत वाईट अवस्थेत होती. भदंत धम्मसारथी आणि त्यांच्या संघामुळे या परिसराचा कायापालट झाला आहे असे विचार धर्मेश प्रसेनजीत यांनी कार्यक्रमाचे संचालन करताना सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात अन्नपूर्णा दुपटे यांच्या धम्मगीताने झाली. सभेला मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती. प्रा. यशवंत दुपटे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

## राज्यात खनिज संपत्तीची लूट

**नागपूर :** राज्यात बेकायदेशीर खाणकामाचा आलेख वाढतच असून खनिज संपत्तीची लूट सुरू आहे. माहितीच्या अधिकारातून राज्यभरातील एकूण कारवाईची प्रत्येक वर्षीची वाढती आकडेवारी बघता हा धक्कादायक तपशील पुढे आला आहे. या लुटीबाबत आपण जाणून घेऊ या. महाराष्ट्रात बॉक्साईट, अगेट, चुनखडी, कोळसा, लोहखनिज, मँगनीज, चुनखडी, सिलिका वाळू, कायनाईट, सीलिमनाईट, क्रोमाईट, इलमेनाईट, डोलोमाईट, तांबे, टंगस्टन, जस्त, सोपस्टोन, क्वार्टझ, अगेट, क्ले, बेराईट, ग्रॅफाईट फ्लोराईट इत्यादी खनिजे आढळून येतात. या खनिजांपासून केंद्र व राज्य सरकारला मोठा महसूलही मिळतो. परंतु, बेकायदेशीर खाणकामातून या खनिजांची लूट होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे सरकारचा कोट्यावधींचा महसूलही बुडत आहे. राज्यातील खनिज संपत्तीची लूट थांबवण्यासाठी शासनाकडून राज्यात कारवाया वाढवण्यात आल्या आहेत. 2022-23 या आर्थिक वर्षात राज्यातील 35 जिल्हे, शहरात तब्बल 5,946 बेकायदेशीर खाणकामाची प्रकरणे उघडकीस आली.




**मानव कल्याण बुद्ध विहार, शताब्दी नगर, नागपूर दररोज सामुदायिक वंदना महापुरुषांच्या जयंती - स्मृती दिन, बाल संस्कार शिबीराचे आयोजन, धम्म मेळाव्यांचे आयोजन, वर्षावासात धार्मिक ग्रंथांचे वाचन, विविध स्पर्धांचे आयोजन.**

संवाद मित्र
सुधाकर स्थूल
मो.9372665640

## दंगलग्रस्त भागात मोजक्याच नमाजींच्या उपस्थितीत नमाजपठण



**नागपूर :** नागपुरातील महाल परिसरात दोन धार्मिक गटात उसळलेल्या दंगलीनंतर अद्यापही तणावाचे वातावरण आहे. नागपूर शहर पोलिसांकडून या भागात संचारबंदी लावण्यात आली आहे. दरम्यान शुक्रवारी (21 मार्च 2025) दंगलग्रस्त भागातील मशिदीमध्ये मोजक्याच नमाजींच्या उपस्थितीत नमाज अदा करण्यात आली. याप्रसंगी जबाबदार लोकांनी एक महत्वाचा निर्णय घेतला.

नागपुरातील दंगलग्रस्त भागातील मशिदीमध्ये मोजक्याच नमाजीच्या उपस्थितीत शुक्रवारी नमाजपठण झाले. . या भागात पोलिसांकडून लावलेली संचारबंदी पाहता विविध मशिद कमिटी आणि समाजातील जबाबदार लोकांनी महत्वाचा निर्णय घेत घरातूनच नमाज पठण करण्यासाठी आग्रह धरला. चिटणीस पार्क आणि शिवाजी चौक येथील मशिदीमध्ये फक्त चार ते पाच लोकच नमाज पठणासाठी आले. परिसरात लागलेली संचारबंदी आणि त्यामध्ये पाच पेक्षा जास्त लोकांच्या एका ठिकाणी गोळा होण्यावर लावण्यात आलेले प्रतिबंध पाहता मशीद कमिटी तसेच मुस्लिम बांधवांनी नमाज पठण करण्यासाठी लोकांनी मशिदीत येऊ नये, असे आवाहन केले आहे. त्यामुळे चिटणीस पार्क येथील मशिदीत जिथे रमजान महिन्यातील शुक्रवारी किमान 400 ते 500 लोक नमाज पठण करण्यासाठी यायचे, त्या ठिकाणी आज फक्त पाचच लोक नमाज पठण करणार आहे.

## स्थळ चित्रपटाचे युवा दिग्दर्शक जयंत सोमलकर सन्मानित



**चंद्रपूर :** सध्या सर्वत्र स्थळ चित्रपटाची चर्चा सुरू आहे. विदर्भातील विशेषतः चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नवोदित कलाकारांनी सादर केलेला व शेतकऱ्यांच्या संघर्षमय जीवनावर आधारित स्थळ चित्रपटाकडे सध्या रसिकांचा ओढा वाढला आहे. या चित्रपटाची निर्मिती, दिग्दर्शन लक्षात घेता युवा दिग्दर्शक जयंत सोमलकर यांचा सत्कार धनोजे कुणबी समाज मंदिर लक्ष्मीनगर आणि राष्ट्रसंत विचार साहित्य परिषदेच्या वतीने मिराज सभागृहात करण्यात आला. यावेळी संपूर्ण चित्रपट शो आरक्षित केला गेला होता.

सत्कार समाज मंदिराचे अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम सातपुते व राष्ट्रसंत विचार साहित्य परिषद केंद्रीय समितीचे ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अतुल देऊळकर, विनोद पिंपळशेंडे, प्रा. नामदेव मोरे, ॲड. विलास मानकर, प्रा. अनिल डहाके, अण्णाजी जोगी, गणपत हिंगाणे, वासुदेव बोबडे, डॉ. विजय हेलवटे, डॉ. शिवम सातपुते याशिवाय 250 समाजबांधव उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविक प्रा. नामदेव मोरे केले. हा चित्रपट आपल्यासोबत इतरांनीही बघावा, हाच आमचा हेतू असल्याचे मत मांडले.

## नागपूर महापालिका आयुक्तांनी सादर केले इलेक्शन बजेट

### मालमत्ता करात कुठलीच दरवाढ नाही

**नागपूर :** नागपूर महापालिकेच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ती केव्हा होईल याची सध्या कोणालाच खात्री देता येत नाही. सर्व काही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून आहे. मात्र महापालिकेचे प्रशासन आणि प्रशासक यांनी मात्र महापालिकेचे बजेट सादर करताना निवडणुकीची काळजी घेतली असल्याचे दिसून येते. महापालिका आयुक्त आणि प्रशासक अभिजित चौधरी यांनी शुक्रवारी सन 2025-2026 या आर्थिक वर्षाचे 5 हजार 438.61 कोटी रुपयांचे प्रस्तावित बजेट सादर केले. हे करीत असताना मतदार नाराज होणार नाही याची काळजी घेऊन त्यांनी मालमत्ता करात कुठलीच दरवाढ केलेली नाही. विशेष म्हणजे महापालिका प्रशासनाने गेल्या बजेटमधील तब्बल 698.87 कोटी रुपये खर्चच केलेले नाहीत. ही रक्कम नव्या बजेटमध्ये समाविष्ट करून प्रारंभीची शिल्लक म्हणून दाखवण्यात आली आहे.




महापालिकेच्या तिजोरित भर घालण्यासाठी आयुक्तांनी शहरातील अधिकाधिक मालमत्ता कराच्या जाळ्याखाली आणण्याचा प्रयत्न केला जाईल, असे ठेवणीतील उत्तर दिले. चालू आर्थिक वर्षात 11063 नवीन मालमत्ता कराच्या कक्षेत आणल्या आहेत. त्यातून 4 कोटी 52 लाख रुपये अतिरिक्त उत्पन्न प्राप्त झाले आहे. मालमत्ता कराचे देयके पाठवण्यासाठी डाक विभागाची मदत घेतली जात आहे. त्यामुळे सर्वांना देयके मिळू लागली आहेत. काही पत्ते चुकीचे असल्याने ते दुरुस्त केले जात आहेत. याशिवाय मालमत्ताधारकांना एसएमएस आणि व्हॉट्सअॅपवर इंग्रजी आणि मराठी भाषेतून देयके पाठवण्यात येत आहेत. ग्रीन बिल्डिंग बांधणीला प्रोत्साहन देण्यासाठी मालमत्ता करात 10 टक्के सुट देण्याचे आयुक्तांनी जाहीर केले आहे. चालू आर्थिक वर्षात महापालिकेला 350 कोटी रुपये मिळतील, अशी अपेक्षा आयुक्त चौधरी यांनी व्यक्त केली. मालमत्ता कराची थकबाकी भरण्यासाठी महापालिकेच्यावतीने सुमारे तीन वर्षांपासून सवलत देणारी अभय योजना राबविली जात आहे. या योजनेंतर्गत थकबाकीवरून दंड माफ केला जात आहे. यानंतरही अनेक जण कराची रक्कम भरत नाहीत. ही योजना राबवण्यासाठी लोकप्रितिनिधींचा दबाब असतो असे समोर आले आहे. याबाबत विचारणा केली असता आयुक्त म्हणाले, ही योजना वारंवार राबवणे चुकीचे आहे. यापुढे ती राबवली जाणार नाही. वारंवार संधी देऊनही अनेक जण थकबाकी भरत नाहीत. त्यामुळे शास्तीला काही अर्थ राहात नाही.

## महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन संविधानिक मार्गाने यशस्वी होऊ शकते : प्रकाश दार्शनीक

**नागपूर :** दि स्कूल ऑफ नोबल थॉट अंतर्गत पॉलिटिकल स्कूल आयोजित व्याख्यान क्रमांक 563 समाज भवन चारिका बुद्ध विहार शिल्पा सोसायटी नरेंद्र नगर नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानाचा विषय होता 'महाबोधी महाविहार बुद्धगया मुक्ती आंदोलन व पुढील दिशा' या व्याख्यानासाठी प्रकाश दार्शनीक, बौद्धिक प्रमुख, समता सैनिक दल नागपूर यांना निमंत्रित करण्यात आले होते. आपल्या व्याख्यानाचा विषय मांडताना प्रकाश दार्शनीक यांनी बौद्ध विहार मुक्तीच्या लढ्याचा अनागरीक धम्मपाल पासून सुरु झालेला इतिहास ते भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांनी केलेल्या आंदोलनापर्यंत आढावा घेतला. सध्या सुरु असलेले आकाश लामा यांच्या नेतृत्वात बुद्धगया येथे सुरु असलेले महाविहार मुक्तीचे भिक्षुतर्फे चालविल्या जाणाऱ्या आंदोलनाची माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एन.व्ही. ढोके यांनी 20 मार्चला होऊ



घातलेल्या शांती मार्चमध्ये सगळ्या जनतेने एकत्रितपणे सहभाग नोंदविणे आवश्यक आहे, असे उपस्थितांना आवाहन केले. या कार्यक्रमात सुनील सारीपुत्त तसेच अरुण गाडे यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी सुद्धा 20 मार्चचा शांती मार्च यशस्वी करण्यासाठी सगळ्यांनी एक दिलाने पुढाकार घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले. शेवटी एस.एन. मुळे यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाला वसाहती मधील नागरिकांची भरगच्च उपस्थिती होती.

## लाईनमन जनतेचा सखा, अंध:काराचा कर्दनकाळ : ज्ञानेश्वर रक्षक



**नागपूर :** विजेला लोकांच्या घरापर्यंत पोहचवणाऱ्या, विजेच्या खांबांवर चढून विजप्रवाहीत तारांना जोडणारा, लाईनमन आमचा खरा सखा असतो. आमच्या घरातील अंधःकाराला दूर करणारा कर्दनकाळ असतो. प्रत्येक उत्पादनाच्या यंत्रापर्यंत वीज पोहचवणारा खरा उत्पादन क्षेत्राच्या प्रगतीचा मुख्य घटक लाईनमन असतो. त्याचा जनमाणसाने नेहमी सन्मान करायला हवा. असे गौरोद्गार लाईनमन दिनी राष्ट्रसंत तुकडोजी विचार साहित्याचे अभ्यासक ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक यांनी काढले. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत नंदनवन उपविभाग, महाल विभाग नागपूर, विभागाच्या कार्यालयात हा प्रेरणादायी सन्मान सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याचे अध्यक्ष विजअधिकारी धीरज बारापात्रे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले, प्रत्येक लाईनमनने अतीउत्साही न होता स्वतःच्या जीवीताची काळजी घ्यायला हवी. याप्रसंगी श्रीगुरूदेव युवामंचाचे विदर्भ संघटक बाळू शिंदे प्रबोधन पीठावर उपस्थित होते. याप्रसंगी कार्यतत्पर लाईनमन यांचा सन्मान राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे साहित्य देऊन मान्यवरांच्या हस्ते केल्या गेला. प्रवीण तेलंग, श्रीकांत बहादुरे, प्रशांत गीरीपुंजे, विक्रम उराडे, योगेश इटनकर या वीज अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सोहळा पार पडला.

## औरंगजेबाजी कबर उखडून टाकायची असेल तर टाका, मुस्लिमांना देशद्रोही कशाला ठरवता? : अनिस अहमद

**नागपूर :** 'नागपूरमध्ये उसळलेल्या दंगलीला विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल हेच दोषी आहेत. त्यांच्या कार्यकर्त्यांनी कुराणाची आयात (ओवी) असलेली हिरवी चादर जाळली. लाथ मारून अपमान केल्याने मुस्लिमांच्या भावना भडकल्या.' असा आरोप करत आणि ज्यांनी दगडफेक करून जाळपोळ केली त्यांचा निषेध नोंदवत मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधींनी ही घटना पूर्वनियोजित होती, यास स्पष्ट शब्दात नकार दिला. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत नागपूरमधील दंगल पूर्वनियोजित होती असे सांगितले आहे.

तर दुसरीकडे ही दंगल जवळून हाताळणारे नागपूरच्या पोलिस आयुक्तांनी रवींद्र सिंघल यांनी ही घटना पूर्वनियोजित नव्हती असे स्पष्ट केले आहे. दोघांच्या परस्पर विरोधी वक्तव्यावर मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधींनी राज्य सरकारच्या भूमिकेवर टीका केली. यावेळी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव व माजी मंत्री अनिस अहमद यांनी औरंगजेबाच्या कबरीशी आमचा काही संबंध नाही, ती कबर उखडून टाकायची असेल तर उखडून टाका, मात्र मुस्लिमांना देशद्रोही ठरवू नका, अशी विनंती केली.

> “औरंगजेबाच्या कबरीवरून सुमारे दोन महिन्यांपासून वाद सुरु आहे. मात्र यास एकही मुस्लिमाने विरोध दर्शवला नाही. प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. त्यामुळे मुस्लिम धर्मीयांसाठी सर्वाधिक पवित्र समजली जाणारी कुराणाचे आयात लिहली असलेली हिरवी चादर जाळून त्यांना उद्युक्त करण्यात आले. औरंगजेबची कबर खोदायची आहे तर खोदून टाका आम्हाला त्याचे काही देणेघेणे नाही.'



काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव तसेच माजी मंत्री अनिस अहमद, डॉ. मो. अवेस हसन, ॲड. आसिफ कुरेशी, हाजी मोहम्मद ताहीर रजा आदींच्या पुढाकारात मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधींनी पत्रकार परिषद घेऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी सर्वांनीच ज्यांनी अशा पद्धतीचे कृत्य केले, लोकांना भडकवले, प्रवृत्त केले त्या सर्वांवर कारवाई करण्याची मागणी केली. ज्या असमाजिक तत्त्वांनी हिंसाचार केला त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी मात्र केवळ धर्म बघून कोणालाही दोषी ठरवण्यात येऊ नये, अशी मागणी केली आहे.

जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क
९३२५६२९६३५

स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648